## नियमित दिवाणी मुकदमा क्र.१०/२०१५ मधील नि.४२ खालील आदेश
## (वैशाली सुनिल हिंगमिरे वगैरे–३ विरुध्द गुरुलिंग विरुपाक्ष हिंगमिरे वगैरे–३४)
## (CNR–MHSN090000622015)

१. वादी क्र.१ ते ३ यांनी प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचेकडून प्रत्येक वादींना दरमहा र.रु.१०,०००/– इतकी रक्कम पोटगी म्हणून देवविणेबाबत प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, वादी यांनी सदरचा दावा सरस–निरस मानाने वाटपाचा, अलग पृथ्थक कब्जाचा व निरंतर ताकिदीकरिता केला आहे. दावामिळकती या वादी व प्रतिवादी क्र.१ ते ९ यांचे वाडवडिलार्जीत मालकी हक्क वहिवाटीच्या आहेत. दावामिळकतीमध्ये अद्यापपर्यंत वादी व प्रतिवादी, अन्य त्यांचे पुर्वहक्कदार यांचेत सरस निरस मानाने वाटप झालेले नाही. वादी क्र.१ चा विवाह दि.१३.०५.२००१ रोजी राजापूर येथील सुनिल गुरुलिंग हिंगमिरे यांचेशी झाला होता. प्रतिवादी क्र.१ हे वादी क्र.१ चे सासरे, वादी क्र.२ व ३ चे आजोबा आहेत. प्रतिवादी क्र.२ व ३ हे वादी क्र.१ चे दीर आहेत व वादी क्र.२ व ३ चे चुलते आहेत. वादी क्र.१ चे पती व वादी क्र.२ व ३ चे वडील सुनिल गुरुलिंग हिंगमिरे हे दि.०५.०३.२००७ रोजी मयत झाले असुन त्यांचे मृत्यु नंतर प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी वादीशी जुळवुन घेतले नाही. याउलट त्यांना जाणीवपुर्वक त्रास देणे चालु ठेवले की जेणेकरुन वादी राजापुर येथे राहु नयेत असा त्यांचा हेतु होता. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या त्रासाला कंटाळुन वादी क्र.१ ते ३ वादी क्र.१ चे माहेरी आटपाडी येथे सन २००७ पासुन राहत आहेत. वादी क्र.२ हा श्री भवानी विदयालय आटपाडी येथे इयत्ता ८ वी मध्ये व वादी क्र.३ सिध्दी श्रीमती वत्सलादेवी देसाई गर्लस हायस्कुल आटपाडी येथे ७ वी मध्ये शिक्षण घेत आहेत.

३. दावा कलम १अ व १ब मध्ये वर्णन केलेल्या शेतजमीन व घरमिळकती या वादी व प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या वडिलार्जित मालकी हक्क वहिवाटीच्या मिळकती आहेत. तसेच काही मिळकती वडिलार्जित उत्पन्नातुन खरेदी घेतलेल्या आहेत. वादी प्रतिवादी यांचे अदयाप पर्यत सरसनिरस मानाने वाटप झालेले नाही. दावा मिळकतीमध्ये वादीचा कायदेशीर हक्क व हिस्सा आहे. प्रतिवादी यांनी वादी क्र.२ व ३ यांच्या शिक्षणाची अगर त्यांचेसह वादी क्र.१ चे चरितार्थ अगर तब्येतीची विचारपुस करण्याची जबाबदारी असताना कधीही केली नाही. दावा मिळकतीमधील मिळणारे कोणतेही उत्पन्न आज अखेर वादींना दिलेले नाही अगर वादी क्र.१ ते ३ यांचे उदरनिर्वाह, कपडेलत्ते, औषधपाणी इत्यादीची कोणतीही तजवीज प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी केलेली नाही. वस्तुत: सुनिल यांचे मृत्यूनंतर वादी क्र.१ ते ३ यांना सांभाळण्याची, पालनपोषण करण्याची कायदेशीर व नैतिक जबाबदारी प्रतिवादी क्र.१ ते ३ यांची आहे. राजापुर हे गांव सधन असुन दावा

मिळकती बागायती आहेत. दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी उस, द्राक्षे, भुईमुग, सोयाबीन अशी नगदी पिके घेत आहेत. त्यातुन त्यांना वर्षाकाठी रक्कम रुपये वीस लाखांपर्यंत उत्पन्न मिळते. प्रतिवादी यांची वादी यांना पोटगी देण्याची ऐपत आहे. वादीच्या हिस्स्याचे उत्पन्न देखील प्रतिवादी क्र.१ ते ३ घेत असुन त्यातील कोणताही हिस्सा वादींना देत नाहीत. वादी क्र.१ हिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या त्रासामुळे वादींना नाईलाजास्तव आटपाडी येथे रहावयास लागत आहे. वादी क्र.१ हिला वादी क्र.२ व ३ यांचा शैक्षणिक अगर अन्य खर्च करणे अशक्य झाले आहे. सबब वादी यांनी दावा मिळकतीतुन येणा–या उत्पन्नातुन दरमहा प्रत्येकी १०,०००/– पोटगी मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज केलेला आहे.

४. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी नि.४७ कडे म्हणणे दाखल करुन वादीच्या अर्जास तीव्र हरकत दर्शविली आहे. प्रतिवादी यांचे कथनाप्रमाणे प्रतिवादी वादी यांना त्यांचे सोबत रहाण्यास सांगत असतानाही वादी तिचे माहेरी निघुन गेलेली आहे. वादी क्र.१ चे पति सुनिल यास मृत्युपुर्वी ३ ते ४ वर्षे ब्रेनटयुमर हा विकार होता. कोल्हापुर येथील रोहिदास हॉस्पीटल येथे सन २००५ साली सुनिल यांचे या विकाराबाबत ऑपरेशन झालेले होते. त्यावेळी प्रतिवादी यांनी औषधोपचार व ऑपरेशन यासाठी रक्कम रुपये तीन लाख इतकी रक्कम खर्च केली होती. यासाठी त्यांना मिळकतीवर बोजा निर्माण करुन कर्ज घ्यावे लागलेले होते. सुनिल हा सन २००७ साली मयत झाला असुन त्यांचे औषधोपचारासाठी प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी एकुण रक्कम रुपये आठ ते दहा लाख एवढा खर्च केलेला होता व आहे. त्यासाठी त्यांना खासगी लोकांकडुन कर्जे घ्यावी लागली होती व पै पाहुण्याकडुन उसनवार रक्कमा घ्याव्या लागल्या होत्या. सदर कर्ज व उसनवार रक्कमा अदयापर्यंत प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना परतफेड करता आलेल्या नाहीत. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचा शेती हाच व्यवसाय असुन गेले चार वर्षापासुन त्यांना शेतीतुन अपेक्षित असे दुष्काळामुळे उत्पन्न मिळालेले नाही. प्रतिवादी क्र.१ हा वयोवृध्द असुन त्यांची पत्नी कायमपणे आजारी असते व तिलाही औषधोपचारासाठी बरीच रक्कम खर्च होत आहे. याची सर्व माहिती वादींना असतानाही प्रतिवादींना त्रास देण्यासाठी वादींनी प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे.

५. सदरचा अर्ज दाखल करणेचा वादी यांना कोणताही कायदेशीर अधिकार नाही. वादीने प्रतिवादीच्या उत्पन्नाबाबत केलेली मागणी अवास्तव असुन प्रतिवादी यांना शेतीतुन अशाप्रकारे कोणतेही उत्पन्न मिळत नाही. नैसर्गिक परिस्थितीमुळे वाद मिळकतीतून कोणत्याही प्रकारचे उत्पन्न मिळत नसल्याने प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना त्यांचे कुटुंबाचा चरितार्थ चालविणे अशक्य झालेले आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी मुलगा सुनिलचे औषधोपचारासाठी वाद मिळकतीवर भरमसाठ कर्जे काढलेली आहेत. प्रतिवादी क्र.३ यांना मणक्याचा व साखरेचा आजार असुन त्यांचे पत्नीस संधीवात व

हदयविकाराचा आजार आहे. त्यामुळे प्रातिवादी क्र.१ ते ३ यांना शेतीतुन तुटपुंजे उत्पन्न मिळत असुन घरातील खर्च भागविणे अवघड झाले आहे. प्रतिवादी यांनी वादींना सगळे एकत्र राहुया असे सांगितले असता वादी ऐकणेस तयार नाहीत. वादी क्र.१ आटपाडी येथील हायस्कूलमध्ये लिपीक पदावर कार्यरत असुन तिला चांगला पगार मिळतो. त्यातुन ती स्वतः सह मुलांचे पालनपोषण व देखभाल करत आहे. सबब या सर्वाचा विचार करता वादीचा अर्ज नामंजुर व्हावा.

६. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादीतर्फे विधिज्ञांनी केलेला सविस्तर युक्तिवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा वादी क्र.१ ते ३ यांनी प्रतिवादी यांचेविरुद्ध दावामिळकतीतील त्यांचा कायदेशीर हिस्सा मिळणेसाठी म्हणजेच वाटपासाठी केलेला आहे. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी त्यांचे कैफियतीत गट क्र.२३२ हि वडीलार्जित असल्याचे नाकारले आहे. यावरुन गट क्र.२३२ खेरीज अन्य मिळकती वडिलार्जित असल्याचे प्रतिवादींना मान्य असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. प्रतिवादी यांनी त्यांचा भाउ सुनिल व वादी क्र.१ चा पती व वादी क्र. २ व ३ चे वडिल असल्याचे,सुनिल मयत असून वादी क्र.१ ते ३ हे आटपाडी येथे राहत असल्याचे नाकारलेले नाही. गट नं.२३३, २४८, २६० व २७२ या शेतमिळकती आहेत. नि.६ ते नि.९ कडील या मिळकतींचे सातबारा उता–यांचे अवलोकन केले असता, गट नं.२३३ मध्ये १ हे ४० आर क्षेत्रात प्रतिवादी क्र.१ द्राक्षे पीक घेत असल्याचे व अन्य मिळकतीत हायब्रीड ज्वारी व सोयाबीन इत्यादि पिके घेत असल्याचे दिसून येते. वादी क्र.१ ते ३ हे प्रतिवादी क्र.१ चा मयत मुलगा व प्रतिवादी क्र.२ व ३ यांचा मयत भाऊ असून या मिळकतीत त्याचाही कायदेशीर हिस्सा आहे. वादी क्र.१ प्रतिवादी क्र.१ ची विधवा सून व वादी क्र.२ व ३ हि प्रतिवादी क्र.१ यांची नातवंडे आहेत.

७. हिंदु अडॉप्शन ॲण्ड मेन्टेनन्स ॲक्ट १९५६ मधील कलम १९ मध्ये खालीलप्रमाणे तरतुद करणेत आलेली आहे. कलम १९ – <u>Maintenance of Widowed daughter-in-law.</u>

(1) A Hindu wife, whether married before or after the commencement of this Act, shall be entitled to be maintained after the death of her husband by her father-in-law:

provided and to the extent that she is unable to maintain herself out of her own earnings or other property or,where she has no property of her own, is unable to obtain maintenance,-

(a) from the estate of her husband or her father or mother, or

(b) from her son or daughter , if any, or his or her estate.

(2) Any obligation under sub-section (1) shall not be enforceable if the father-in-law has not the means to do so from any coparcenary property in his possession out of which the daughter-in-law has not obtained any share, and any such obligation shall cease on the re-marriage of the daughter in law.

८. या तरतुदीप्रमाणे वादी क्र.१ म्हणजेच सुनेला पोटगी देणे हि प्रतिवादी क्र.१ सास–याची

वैयक्तिक जबाबदारी नसून ती सास–यांकडे असलेल्या वडिलार्जित मिळकतींवर अवलंबून राहते. तसेच सुन स्वत:चा सांभाळ करणेस असमर्थ असेल, सून तिचा पती, आई–वडिल यांचे मालमत्तेतून स्वत:चा सांभाळ करणेस असमर्थ असेल किंवा तिचा मुलगा/मुलगी यांचेमार्फत अगर त्याचे मालमत्तेतून स्वत:चा सांभाळ करणेस असमर्थ असेल तर सास–याने या कलमाप्रमाणे सुनेचा सांभाळ करणे बंधनकारक आहे. तसेच पतीचे वडिलांकडे सर्व वडिलार्जित मिळकतींचा ताबा असेल व सुनेला त्या मिळकतींमधील सरसनिरस मानाने कोणताही हिस्सा मिळाला नसेल, वडिलार्जित मिळकतीतून पुरेसे उत्पन्न मिळत असेल आणि सुनेने पुर्नविवाह केला नसेल तर अशा परिस्थितीत कलम १९ प्रमाणे प्रतिवादी क्र.१ म्हणजेच सास–याने सुनेचे पालनपोषण व सांभाळ करणेसाठी पोटगी देणे बंधनकारक आहे. सबब सदर तरतुद पाहता, प्रस्तुत प्रकरणात वादी क्र.१ विधवा सुनेकडे स्वतचे उत्पन्न अगर उत्पन्नाचे साधन नसेल,ती तिचा मयत पती किंवा आईवडिलांचे मिळकतीतून स्वत:सह मुलांचा चरितार्थ चालवू शकत नसेल आणि तिचे सास–याकडे सर्व वडिलार्जित मिळकतींचा ताबा असेल,त्या मिळकतीतून सासरा उत्पन्न मिळवत असेल व तिला मुल नसल्यास विधवा सुनेचा सांभाळ सास–याने केला पाहिजे.

९. प्रस्तुत प्रकरणात वादीने स्वत:करिता व मुलांकरिता प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचेकडून पोटगी मिळणेची विनंती केलेली आहे. वस्तुत कलम १९ प्रमाणे विधवा सुनेचा सास–याने सांभाळ करावा अशी तरतुद आहे. सबब प्रतिवादी क्र.२ व ३ कडून वादी पोटगी मागू शकते का याबाबत वादी–प्रतिवादीतर्फे विधिज्ञांनी कोणतीही कथने केलेली नाहीत अगर युक्तिवाद केलेला नाही. याकामी वादीचा पती सुनिल मयत आहे, दावामिळकती वडिलार्जित व वडिलार्जित मिळकतीच्या उत्पन्नातून खरेदी केलेल्या आहेत,या मिळकतींचे वादी–प्रतिवादींमध्ये अदयाप सरसनिरस मानाने वाटप झालेले नाही, दावमिळकतीमध्ये प्रतिवादी क्र.१ ते ३ यांची कब्जेवहिवाट असून या मिळकतींमधून ते पीक घेत आहेत व त्यातून आर्थिक उत्पन्न मिळवत आहेत या बाबी प्रथमदर्शनी प्रतिवादी यांनी नाकारलेल्या नाहीत. वादीकडे तिचा व मुलांचा सांभाळ करणेस तिचे मयत पती व माहेरकडून पुरेशी साधने,मालमत्ता उपलब्ध आहेत व त्यातील उत्पन्नातून ती आर्थिक उत्पन्न मिळवून स्वतसह मुलांचा सक्षमपणे उदरनिर्वाह करत आहे असा कोणताही बचाव प्रतिवादी यांनी घेतलेला नाही अगर तसे दर्शविणारा लेखी पुरावा याकामी सादर केलेला नाही. प्रतिवादी यांनी वादी आटपाडी येथील हायस्कुलमध्ये लिपिक पदावर कार्यरत असून तिला पुरेसे उत्पन्न आहे, सुनिलचे उपचाराकरिता प्रतिवादी यांनी कर्जे काढलेली असून ती थकित आहेत असे दर्शविणारा कोणताही प्रथमदर्शनी पुरावा प्रस्तुत कामी दिलेला नाही. या सर्व बाबींचा विचार करता,सर्व दावामिळकती प्रतिवादी क्र.१ ते ३ चे कब्जेत असल्याने व त्यातील मयत सुनिलचा हिस्सा वादींना वाटप करुन न दिल्याने त्यातून मिळणारे उत्पन्नातून प्रतिवादी क्र.१ ने वादी यांचे पालनपोषणासाठी व उदरनिर्वाह व अन्य मुलभुत

गरजांचे पुर्ततेसाठी दावामिळकतींचे वाटप होईपर्यंत दरमहा अंतरिम पोटगी देणे योग्य व न्यायोचित असल्याचे निष्कर्षास प्रस्तुत न्यायालय पोहोचले आहे.

१०. याकामी वादी यांनी प्रतिवादी दावामिळकतीतून उस, द्राक्षे, भुईमुग, सोयाबीन अशी नगदी पिके घेत असून त्यातुन त्यांना वर्षाकाठी रक्कम रुपये २० लाखांपर्यंत उत्पन्न मिळते असे कथन केले आहे. परंतु असे रक्कम रुपये वीस लाख उत्पन्न मिळत असलेचे दर्शविणारा कोणताही प्रथमदर्शनी पुरावा याकामी दिलेला नाही. तथापि याकामी दाखल केलेल्या दावामिळकतींचे सातबारा उता-यांवरुन प्रतिवादी क्र.१ ते ३ हे द्राक्षे, सोयाबीन, उस अशी नगदी पिके घेत असल्याने त्याप्रमाणात आर्थिक उत्पन्न मिळत असणेची शक्यता प्रथमदर्शनी दिसून येत आहे व अशी उत्पन्न क्षमता याकामी पोटगी रक्कमेचे प्रमाण ठरविताना विचारात घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र.१ हा वृद्ध व्यक्ती असून त्याचेवर त्याचे पत्नीचीही जबाबदारी आहे हि बाब लक्षात घेणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी गट नं.२३२ वडिलार्जित असल्याचे नाकारले आहे. परंतु त्यांचेच म्हणणेतील कथनांप्रमाणे दावामिळकतीतील उत्पन्नाखेरीज त्यांना उत्पन्नाचे अन्य साधन नाही. यावरुन सदर गट नं.२३२ हि मिळकत वडिलार्जित उत्पन्नातून खरेदी केलेली असणेची शक्यता प्रथमदर्शनी दिसून येते व त्यामुळे सदर मिळकत वडिलर्जित मिळकतींमध्ये समाविष्ट होवून त्यातील हिस्सा अगर उत्पन्नामध्ये वादी कायदयाने हिस्सा मागू शकते. सबब गट नं.२३२ या मिळकतीचे उत्पन्नातूनही प्रतिवादी वादींचा सांभाळ करु शकतात हि बाब स्पष्ट होते. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी सुनिलचे मृत्युनंतर वादी क्र.१ ते ३ यांचे पालनपोषण व उदरनिर्वाहाकरिता व्यवस्था केलेचे कथन केलेले नाही. यावरुन प्रतिवादी वडिलार्जित मिळकतीत सरसनिरस मानाने वादींना त्यांचा हिस्सा न देता त्यातून उत्पन्न मिळवूनही वादी क्र.१ ते ३ यांचे पालनपोषण,सांभाळ करणेचे कायदेशीर व नैतिक जबाबदारीकडे दुर्लक्ष करत असल्याचे स्पष्ट होते. सबब, या सर्व विवेचनाचा विचार करता वादीचा अर्ज मंजूर करणेचे निष्कर्षास प्रस्तुत न्यायालयास आहे. सबब, वरील सर्व कारणांचा विचार करता व निष्कर्षास अनुसरुन मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**:: आदेश ::**

१. वादी यांचा नि.४२ कडील अर्ज अंशत: मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ यांनी वादी क्र.१ ते ३ यांना प्रस्तुत दाव्याचे अंतिम न्यायनिर्णयापर्यंत एकत्रात दरमहा रक्कम रु.५,०००/- अंतरिम पोटगी द्यावी असा करण्यात येतो.

स्वाक्षरी/-

**(श्रीमती एस.एस. मांजरेकर)**

**सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, तासगांव.**

**तासगांव.**

**दि.११.०४.२०१९**